# संघर्ष यात्रा

वर्ष ९ वे अंक ४७ वा सोमवार दि.७ जुलै २०२५ आर.एन.आय. MAHMAR/2016/74758 किंमत :१ रू. पाने :-४ पान-१


# बळीराजाला सुखी ठेवण्याची शक्ती द्यावी

## मुख्यमंत्र्यांचे पांडुरंग चरणी साकडे ;उगले कुटूंबाला मिळाला पुजेचा मान

पंढरपूर । प्रतिनिधी

पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले. देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज (दि. ६) पंढरपूर येथे श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा केली. नाशिक जिल्ह्यातील जाते येथील कैलास दामू उगले व कल्पना कैलास उगले या मानाच्या वारकरी दाम्पत्याला पुजेचा मान मिळाला.



देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने भगवान पांडुरंगाची पूजा करायला मिळणे, हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण असतो आणि याचे शब्दात वर्णन अशक्यप्राय आहे. आपल्या वारीची परंपरा कुठल्याही गोष्टीची तमा न बाळगता अखंडितपणे सुरु आहे. मुघली आक्रमण व इंग्रजांच्या राजवटीतही ही परंपरा अव्याहतपणे सुरु राहिली. सातत्याने या परंपरेत वाढ होत जात आहे. दिंड्यांसोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. त्यात युवकांची वाढलेली संख्या खूप समाधान देणारी आहे, राज्य शासनाने यावर्षी चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न केला. स्वच्छतेमुळे निर्मल वारीसोबत हरित वारी, पर्यावरणपूरक वारी देखील संपन्न झाली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

वारकरी परंपरेत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंगाला पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करताना दरवेळी एक नवीन ऊर्जा मिळते. ही आपली संस्कृतीच अलौकिक आहे. विठ्ठल-रखुमाई हे आपले आराध्य दैवत आहे. सर्व वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी व सन्मार्गाने चालण्याची बुद्धी द्यावी तसेच बळीराजाला सुखी ठेवण्याची शक्तीही द्यावी अशी प्रार्थना करतो, असे मुख्यमंत्री फडणवीस याप्रसंगी म्हणाले.

यावेळी मंत्री गिरीष महाजन, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री संजय सावकारे, मंत्री आकाश फुंडकर, पंढरपूर देवस्थान मंदिरे समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिरे समितीचे पदाधिकारी यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# एकत्र आलोय,एकत्र राहण्यासाठी उद्धव ठाकरेंकडून मनसेसोबत युतीचे संकेत

मुंबई । प्रतिनिधी

आमच्या दोघातील अंतरपाठ अनाजीपंतांनी दूर केला. आमचं एकत्र दिसणे महत्त्वाचे आहे. आम्ही एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठी. आम्ही दोघांनी त्यांचे वापरा आणि फेकून द्या धोरण अनुभवलं आहे. आता आम्ही दोघे मिळून तुम्हाला फेकणार आहोत , अशा शब्दांमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसेबरोबरील युतीची घोषणाच केली.



अनेक वर्षांनी राज आणि माझी जाहीर व्यासपीठावर भेट झाली. त्यांनी मला सन्माननीय उद्धव ठाकरे असे संबोधले. त्याचंही कर्तृत्व आपण सर्वांनी पाहिलं आहे, असे सांगत सन्माननीय राज ठाकरे आणि जमलेल्या माझ्या तमाम मराठी हिंदू माता भगिनींनो अशा शब्दांमध्ये उद्धव ठाकरे आपल्या भाषणाची सुरुवात केली.

राज्य सरकारने शालेय शिक्षणात हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराठी जनतेच्या एकजुटीचा विजय जल्लोष साजरा करण्यासाठी आयाोजित विजय मेळावात बाोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, प्रत्येकवेळीस आम्ही एकत्र येणार का,असा प्रश्न त उपस्थित केला जात होता. आता आमचा म हा मराठीसाठी नाही तर महापालिकेसाठी आहे, असा आरोप केला जात आहे. मात्र आम्ही सत्तेसाठी

(पान २ वर)

# जास्त नाटकं केली तर कानाखाली आवाज काढलाचा पाहिजे

## राज ठाकरे कडाडले

मुंबई । प्रतिनिधी

पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या निर्णयाविरोधात ठाकरे बंधूंनी संयुक्त मोर्चा काढण्याचे ठरवल्यानंतर शासनाला जीआर रद्द करावा लागला . या पार्श्वभूमीवर आज वरळी डोममध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा विजयी मेळावा पार पडला . यावेळी सन्माननीय उद्धव ठाकरे अशी सुरुवात करत राज ठाकरे मराठीवरून पुन्हा कडाडले .



महाराष्ट्रात राहणाऱ्या गुजरातींना मराठी आलीच पाहिजे यात वाद नाही .विनाकारण मारामारी करायची गरज नाही .पण जास्त नाटक केली तर कानाखाली आवाज काढलाच पाहिजे तुम्ही ..असं म्हणत राज ठाकरेंनी फटकारलं . यावेळी सभेला जमलेल्या मनसैनिकांसह सर्वांनी टाळ्या शिट्ट्या वाजवत दाद दिली . सरकारचं पुढचं राजकारण तुम्हाला जातीजातीत

(पान २ वर)

# आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून मिळणार निराधारांना आधार

## संजय गांधी,श्रावणबाळ योजनेचे नवीन ३७८ प्रस्ताव मंजूर

बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण व शहरी भागातील ३७८ निराधार, दुर्बल लोकांचे संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत प्रस्ताव मंजूर झाले असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून निराधारांना आधार मिळणार आहे.



पात्र वयोवृद्ध निराधार, अपंग, विधवा, परित्तत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या समाजातील दुर्बल घटकांना शासनाकडून संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य केले जाते. बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील नागरिकांच्या, या योजनांच्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करून निकषपात्र नागरिकांना लाभ देण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले होते. त्यावर प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर कार्यवाही करत २९ मे २०२५ च्या बैठकीत संजय गांधी निराधार योजनेंतर्गत शहरी भागातील ४५ तर ग्रामीण भागातील ६२ नागरिकांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजनेंतर्गत शहरी भागातील

(पान २ वर)

# बनावट आरसी बुक तयार करणारी टोळी कोल्हापूर पोलिसांनी पकडली

## बीडमधील दोघांचा आरोपीमध्ये समावेश

बीड । प्रतिनिधी

बीड येथील आरटीओ कार्यालयात गेल्या काही वर्षांपूर्वी बनावट दस्ताऐवज तयार करून बाहेर राज्यातील वाहनांना मोठा घोटाळा बाहेर आला. अनेकजणांना जेलवारी करावी लागली. त्यानंतर बीडमधील आरटीओ कार्यालयातील एका एजंटसह नगर रोडवर असलेल्या एका फोटो स्टुडीओ मालकासह सहाजणांना कोल्हापूर पोलिसांनी महागड्या गाड्यांचे आरसी बुक तयार करून परस्पर विक्री केल्या प्रकरणी जेरबंद केले.



कोल्हापूर जिल्ह्यातील टेंबलाईवाडी (ता. करवीर) येथील जुन्या वाहनांची खरेदी, विक्री करणाऱ्यांच्या दोन क्रेटा, एक फॉर्च्युनर

(पान २ वर)

# सरपंच आंधळे खून प्रकरणातील आरोपींचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील सरपंच बापूराव बाबुराव आंधळे यांच्या खूनप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपींचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय, अंबाजोगाई यांनी फेटाळून लावला आहे.



दिनांक २९ जून २०२४ रोजी रात्री आठच्या सुमारास परळी येथे महादेव गित्ते यांच्या घरासमोर सरपंच बापूराव आंधळे यांना बोलावून, आरोपींनी कट रचून पिस्तुलने गोळीबार केला होता. या घटनेत सरपंच आंधळे यांचा जागीच मृत्यू झाला, तर फिर्यादी ज्ञानबा मारुती गित्ते हेही गोळीबारात जखमी झाले होते.

या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात कलम ३०२, ३०७, १२०-ब, ३२६, ३२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील आरोपी १) शशिकांत उर्फ बबन गित्ते हा फरार असून आरोपी २) महादेव गित्ते, ३) मुकुंद गित्ते, ४) राजाभाऊ नेहरकर व ५) राजेश वाघमोडे यांना अटक करण्यात आली होती. सदर आरोपींनी जामीनासाठी जिल्हा व सत्र न्यायालय, अंबाजोगाई येथे अर्ज दाखल केला होता. दरम्यान, सदर जामीन अर्ज प्रलंबित असताना सरकारतर्फे या गुन्ह्यात दोषारोपपत्र सादर करण्यात आले. या प्रकरणात सरकारतर्फे विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. अशोक बालासाहेब कवडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी आरोपींच्या जामीन अर्जास विरोध दर्शवून साक्षी-पुराव्यांच्या आधारे प्रभावी युक्तिवाद मांडला. ॲड. कवडे यांचा युक्तिवाद आणि दोषारोपपत्रातील प्रथमदर्शनी पुरावा ग्राह्य धरून न्यायाधीश श्रीमती तेहरा यांनी दिनांक ४ जुलै २०२५ रोजी आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर केला. या सुनावणीत ॲड. कवडे यांना ॲड. आर. आर. लोंढाळ यांनीही सहकार्य केले.

## संपादकीय

# मुळावर उठणारी शिफारस

काही दिवसांपूर्वी नीती आयोगाने अमेरिकेसोबतच्या व्यापारी करारामध्ये भारत सरकारने जेनेटेकली बदल झालेल्या 'जीएम' पिकांचा कृषी उत्पादनांच्या आयातीत समावेश करावा, अशी शिफारस केली. यापूर्वीही नीती आयोगाने 'जीएम'ला पाठबळ दिले होते. ताज्या शिफारशीनंतर भारतातील कृषी संघटनांत नाराजीचा सूर उमटणे स्वाभाविकच होते. 'जीएम'ला विरोध होण्याची अनेक कारणे आहेत. काही दिवसांपूर्वी नीती आयोगाने अमेरिकेसोबतच्या व्यापारी करारामध्ये भारत सरकारने जेनेटेकली बदल झालेल्या 'जीएम' पिकांचा कृषी उत्पादनांच्या आयातीत समावेश करावा, अशी शिफारस केली. यात नीती आयोगाने प्रामुख्याने मका आणि सोयाबीनसारख्या पिकांचा उल्लेख केला आहे. आपल्याकडे कमी उत्पादन असलेल्या किंवा असून नसल्यासारख्या असलेल्या, तसेच आयातीने फारसा फरक पडणार नाही, अशा कृषी उत्पादनांच्या आयातीला परवानगी द्यावी, असे नीती आयोगाने शिफारस करताना म्हटले आहे. यासंदर्भात तांदूळ, सोयाबीन तेल, झिंगा, चहा, कॉफी, दुग्धजन्य पदार्थ, पोल्ट्री, सफरचंद, बदाम, पिस्ता, काळी मिरी या उत्पादनांच्या आयातीला मुभा देण्याची शिफारस केली; पण नीती आयोगाच्या शिफारशीनंतर भारतातील कृषी संघटनांत नाराजीचा सूर उमटणे स्वाभाविकच होते. यात भारतीय किसान संघ-'बीकेएस' याचाही समावेश होता. हा प्रस्ताव शेतकऱ्यांच्या हिताचा नसल्याचे शेतकरी संघटनेने स्पष्ट केले आहे. एवढेच नाही, तर एकप्रकारे नीती आयोगाने अमेरिकेसमोर गुडघे टेकल्याचा घणाघाती आरोपही केला. दुसरीकडे, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी चर्चेमध्ये अमेरिकेच्या भूमिकेमुळे अडथळे येत असल्याचे चित्र आहे. भारत सरकार आपली बाजारपेठ अमेरिकेच्या 'जीएम' आणि अन्य कृषी उत्पादनाला जागा देण्यास तयार नाही. अशावेळी नीती आयोगाच्या निवेदनात सरकारच्या दृष्टिकोनाचा विचार केलेला दिसत नाही; उलट नीती आयोग सरकारच्या 'जीएम'विरोधी धोरणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत आहे की काय, असा अर्थ निघू शकतो; पण या गोष्टी देशासाठी चांगल्या नाहीत. यापूर्वीदेखील नीती आयोगाने 'जीएम'ला पाठबळ दिले. नीती आयोगाने उपाध्यक्ष प्रोफेसर अरविंद पनगडिया यांच्या नेतृत्वाखाली 'जीएम' पिकांच्या समर्थनार्थ एक अहवाल जारी केला होता. त्यावेळीही त्यास विरोध झाला होता. पहिले म्हणजे बहुतांश 'जीएम' पीक ही हर्बीसाईड किंवा तणविरोधी रासायनिक पदार्थयुक्त आहेत. याचाच अर्थ या पिकांजवळ उगवणारे सर्व तण हर्बीसाईडच्या मदतीने नष्ट करता येऊ शकते आणि त्याचा 'जीएम' पिकांवर कोणताही परिणाम होणार नाही. इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर-'आयएआरसी'ने 'ग्लायफॉस्फेट'ला मनुष्यासाठी हानिकारक असल्याचे म्हटले आहे. अशावेळी हर्बीसाईडचा वापर 'जीएम' पिकांना सुरक्षित करण्यासाठी केला जात असताना, त्याचे काही अंश पिकांत किंवा मातीत शिल्लक राहू शकतात. अशावेळी त्याचे राहिलेले अंश मनुष्याला कर्करोग होण्यासाठी कारणीभूत ठरू शकतात. एका आकडेवारीनुसार, अमेरिकेत दर लाख लोकसंख्येमागे ३५० नागरिकांना कर्करोग असून, भारतात हे प्रमाण लाखामागे केवळ शंभर आहे. याचा अर्थ अमेरिकेत 'जीएम' पिकांसाठी गरजेपेक्षा अधिक प्रमाणात हर्बीसाईडचा वापर होणे. अर्थात, भारतात 'जीएम' खाद्य उत्पादनाचा प्रयोग करण्यास आणि आयातीवर निर्बंध आहे. परंतु, खाद्यतेलाच्या अभावापायी अमेरिका, तसेच अन्य देशांतून खाद्यतेलाची आयात करावी लागते. त्यात नकळतपणे काही खाद्यतेल 'जीएम' खाद्यतेल असू शकते. भारत सरकारला या गोष्टींची जाणीव आहे.

# उमाकिरण शैक्षणिक संकुलातील गैरप्रकार प्रकरणी डॉ.ज्योती मेटे यांनी घेतली रूपाली चाकणकर यांची भेट

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांची शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी येथील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेतली. यावेळी बीड येथे उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घृणास्पद प्रकरा संदर्भात पोलीस यंत्रणेकडून निपक्ष चौकशी होऊन पुढील योग्य ती कारवाई होईल याकडे जातीने लक्ष द्यावे अशी विनंती केली आहे .



मा. सर्वोच्च न्यालायाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम व नियम २०१३ अनुसार शासन निर्णय दिनांक १९ जून २०१४ अन्वये महिला तक्रार निवारण समिती गठीत करणे अनिवार्य आहे. सदर शासन निर्णयाचे अनुच्छेद ५ नुसार शैक्षणिक संस्थामध्येदेखील लैंगिक छळाच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार समिती गठीत करण्याची तरतूद आहे.

उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी यांचा समावेश असल्यास येथे अशी समिती गठीत करण्यात आली होती किंवा कसे, नसल्यास संबधित नियोक्ता यांचेविरुद्ध या अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी अथवा अशी समिती नियुक्त असल्यास समितीने पार पाडलेली जबाबदारी याचा आढावा घेण्यात यावा. पिडीतेचा माध्यमातून समोर आलेला जबाब पाहता अशी समिती कार्यरत असती तर या घटनेस निश्चितच प्रतिबंध झाला असता असे सखेद नमूद करण्यात येते.

मागील काही वर्षात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी खाजगी कोचिंग क्लासेस कार्यरत आहेत, सबब राज्य महिला आयोगाकडून यासर्व ठिकाणी सदर अधिनियमातील तरतुदीनुसार समितीचे गठन होणे व समितीने पार पाडलेली जबाबदारी याचा नियमित आढावा घेण्यात यावा जेणेकरून भविष्यात अशा घटनास प्रतिबंध होईल. याबाबी निदर्शनास आणून दिल्या याप्रसंगी साक्षी हंगे, गीतांजली डोरले, संगीता ठोसर, साधना दातखिळ, संध्या लांगोरे, प्रणिता लांगोरे , मनोज जाधव, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले, अतुल लांगोरे आदी सह शिवसंग्रामच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# के.एस.पी.विद्यालयाचा आषाढी एकादशी निमित्त फराळ वाटप करुन दिंडी सोहळा

बीड । प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचा दिंडी सोहळा थाटामाटात संपन्न झाला, चिमुकल्यांनी काढलेल्या भव्य अशा उत्कृष्ट देखावे आणि भगव्या पताकांच्या आषाढी एकादशीच्या दिंडी सोहळ्यामुळे अवघी पंढरी कालिका नगर बीड च्या रस्त्यावर अवतरल्याचे दिसून येत होते. हा दिंडी सोहळा पाहून अवघे पंढरपूरच अवतरले असा अनुभव यावेळी येत होता. टाळकरी मुले, नऊवारी साडी वेशभूषातील मुली, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत नरहरी महाराज, संत चोखामेळा, संत तुकाराम तसेच संत परंपरेतील अनेक संतांच्या वेशभूषा परिधान केलेली विद्यार्थी, वारकरी संप्रदायाचा भगवा ध्वज हातात धरलेले ध्वजधारी विद्यार्थी, मुली, टाळ मृदूंगाच्या तालावर रममाण झालेली मुले ,मुलीअशी अनेक आकर्षणं या दिंडीत दिसत होती. विठुरायाच्या अनेक भक्ती गीतांवर, अभंगावर मुला, मुलींनी सादर केलेल्या दर्जेदार सामूहिक नृत्यांना परिसरातील नागरिकांनी कौतुक केले. पालकांनी विद्यार्थ्यांचे सादर केलेले कलागुण आपल्या मोबाईलच्या कॅमेरात कैद केले. यावेळी शहरातील नागरिक व पालकांनी दिंडीचे ठिकठिकाणी स्वागत केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, यांच्या हस्ते मुलांना फराळ वाटप करण्यात आले. प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत आषाढी दिंडी साजरी करण्यात आला.

## पान एक वरून

### एकत्र आलोय, एकत्र ...

नाही तर मराठीसाठी एकत्र आलो आहोत मराठी माणूस आपआपसात भांडला आणि दिल्लीतील गुलाम आपल्यावर राज्य करु लागले आहेत. पुन्हा एकदा ते आपल्या मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहेत. आता तुम्ही पालख्याचे भोई होणार की मराठीला पालखीत बसवणार, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.आम्ही कोणत्याही भाषेच्या विरोधात नाही. मात्र हिंदीची सक्ती कधीच सहन करणार नाही. मी मुख्यमंत्री असताना हिंदी भाषेची सक्ती केली नव्हती. आता हिंदी भाषेची सक्ती मान्य करणार नाही, असा इशारही उद्धव ठाकरे यांनी केला.

तुम्ही मराठी लोकांसाठी न्याय मागणाऱ्यांना गुंड म्हणत असताल तर आम्ही गुंड आहोत. तुम्ही शिवसेनेचा आमचा पुरेपूर वापर केला आहे, तुम्हाला महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरेंचा पाठिंबा नसता, तर तुम्ही येथे असता का, आम्हाला हिंदुत्व शिकवणारे तुम्ही कोण? असे सवालही उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्यावेळी एकजूट झाली तशी एकजूट करणे गरजेचे आहे. भारतीय जनता पक्षामधील मराठी लोकांनी एकत्र यावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले.

एक गद्दार काल जय गुजरात बोलला. पुष्पा चित्रपटातला दाढीवाला झुकेगा नही साला म्हणाला; पण हा दाढीवाला उठेगा नही साला म्हणतो. काहीही झालं तरी उठेगा नही, असं म्हणतो, अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर टीका केली.आम्ही एकत्र आलो की, आता काड्या घालण्याचे उद्योग होतील, असा इशारा देत कुणाच्याही लग्नात भाजपावाल्यांना बोलावू नका. येतील जेवण करतील आणि नवरा-बायकोत भांडण लावून जातील. नाहीतर नवरीला पळवून नेतील. भाजपाचे हेच उद्योग आहेत. भाजपाचे स्वतःचे काहीही नाही, अशी बोचरी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

### जास्त नाटकं केली तर...

विभागण्याचा आहे असे सांगत राज ठाकरेंनी सरकारला सुनावलं .

या देशात भाषावार प्रांतरचना झाली ती मुळातच यासाठी ना की की प्रत्येक भाग त्या भाषेचा होता म्हणून .या सगळ्या गोष्टी का सुरू केल्यात ?कशासाठी सुरु केल्या ?यामागचं राजकारण काय ? आत्ताच सांगून ठेवतो ..आज तुम्ही सगळे मराठी म्हणून एकत्र आलात .मराठी म्हणून एकत्र आलात .यांचे पुढचं राजकारण तुम्हाला जातीमध्ये विभागायला सुरू करण्याचं आहे . पुन्हा जातीचा कार्ड खेळायला सुरुवात करणार .मराठी म्हणून तुम्हाला कधीही एकत्र येऊ देणार नाही .पुन्हा जातीपातीत विभागायला सुरुवात करतील . 'आता हे सुरू केलं, कुण्या व्यापाराच्या कानफाडीत मारली मीरा-भाईंदरला . काही हिंदी चॅनलमध्ये गुजराती माणसाला मारलं असं दाखवलं .बाचाबाची मध्ये समोरचा गुजराती निघाला इथला मराठी निघाला .याचा अर्थ गुजरात याला मारलं का ?किती व्यापारी आहेत .. अजून तर काहीच केलं नाही . अर्थात त्यांना मराठी आली पाहिजे यात वाद नाही .विनाकारण मारामारी करण्याची गरज नाही .पण जास्त नाटकं केली तर कानाखाली आवाज काढलाच पाहिजे तुम्ही ..पण चूक त्यांचे असली पाहिजे .एक गोष्ट लक्षात ठेवा .अशी कुठलीही गोष्ट कराल त्याचे व्हिडिओ काढू नका . यावेळी जमलेल्या मराठी बांधवांनी टाळ्या शिट्ट्या वाजवत जोरदार दाद दिली .

'आपल्या आपल्या मध्येच त्यांना कळलं पाहिजे .कळलं का ! मारणारा कधी सांगत नसतो .मार खाणारा सांगत असतो .मला मारलं असं त्यांना सांगू दे .याचा अर्थ त्यांना उगाच मारायचं असं नाही .अनेक गुजराती लोक आहेत . माझे एक मित्र आहेत नयन शहा म्हणून .त्यांना मी गुजराठी म्हणतो . तो अतिशय अप्रितिम मराठी तर बोलतोच .विनोदाचाही अंग आहे . शिवाजी पार्क मैदानामध्ये फिरताना कानाला हेडफोन लावून पु ल देशपांडे ऐकणारा गुजराती आहे . मराठीच बाळकडू हे आमच्यासाठी बाळकडूच होतं .असंही राज ठाकरे म्हणाले .

### आ.संदीप क्षीरसागरांच्या...

४६ तर ग्रामीण भागातील २२५ नागरिकांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. दरम्यान काही अर्ज त्रुटीत असून त्याच्या पुर्ततेसाठी तहसील कार्यालयात संपर्क करण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.

### बनावट आरसी बुक...

बनावट आरसी आणि टीटी फॉर्मवर बोगस सह्या करून परस्पर विकणाऱ्या सहा जणांच्या टोळीला शाहूपुरी पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. त्यांच्याकडून ५९ लाख ७० हजार रुपयांच्या तीन कार जप्त केल्या. यातून बनावट कागदपत्रे तयार करून कार विकणारे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. याप्रकरणी नीलेश रामचंद्र सुर्वे (वय ३३, रा. खेडी, शिवाजीनगर, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी), हसन मगदूम जहागीरदार (३१, रा. कारवांचीवाडी, जि. रत्नागिरी), मोहम्मद अमजद मोहम्मद अहसान कुरेशी (४३, रा.मॉडर्न हसनाबाद को-ऑप.सोसायटी, बेहराम बाग, जोगेश्वरी वेस्ट, मुंबई), सकिब सलीम शेख (२९, रा.सलमान मोहल्ला,संजेरी पार्क,'बी-विंग', महापोली, ता. भिवंडी, जि. ठाणे), शहजामा खान बदरुजमा खान (३६, धंदा आरटीओ एजंट,रा.हत्ती खाना, जुना बाजार, जि. बीड), शेख शाहनवाज शेख आसेफ (४५, धंदा फोटो स्टुडिओ मालक,रा.पवनसूत्र मंगल कार्यालय, नगर रोड, जि. बीड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

# FUN CLUB

## विजेच्या लोळापासून विमानाचा बचाव कसा करतात?

कसं



दरवर्षी पावसाळ्यात आपण, कुठंतरी वीज कोसळून झाड जळून गेल्याच्या किंवा टेलिफोनचे खांब उन्मळून पडल्याच्या बातम्या वाचत असतो. काही वर्षांपूर्वी तर मुंबईतल्या चौपाटीवर पावसाची मजा लुटायला गेलेल्या एका मुलीच्या कानाला लावलेल्या मोबाईलवर वीज कोसळली आणि त्यात त्या मुलीचा अंतही झाला. आकाशातल्या ढगांवर आरुढ झालेल्या त्या विजेपासून काही किलोमीटर अंतरावरच्या जमिनीवरच्या वस्तूंची ही अवस्था, तर मग त्या ढगांमधूनच वाटचाल करणाऱ्या विमानांना त्या विजेपासून किती धोका असेल? असा प्रश्न आपल्याला पडला नाही तरच नवल. पण तसं काही होताना दिसत नाही. आजवर १९६७ साली एका विमानाच्या इंधनाच्या टाकीवरच वीज कोसळल्यानं त्या टाकीचा स्फोट झाला आणि अर्थातच ते विमानही कोसळलं; पण आजमितीला कोणत्याही क्षणी हजारो विमानं जगभर आकाशात उडत असताना अशी दुर्घटना परत झालेली नाही. याचं कारण, विजेच्या लोळापासून बचाव करण्याची व्यवस्था विमानांमध्ये केलेली असते. या व्यवस्थेचे अनेक पैलू आहेत. पहिली म्हणजे, विमानाच्या पायलटला सतत हवामानासंबंधीची माहिती पुरवली जात असते. त्यामुळे जिथल्या ढगांवर मोठ्या प्रमाणात विद्युतभार साचलेला आहे आणि त्याचा निचरा करण्यासाठी तिथं वीज कोसळण्याची शक्यता आहे, अशा भागातून जाताना त्या विद्युतभारांच्या कचाट्यात आपण सापडणार नाही याची काळजी पायलट घेतच असतो. त्याव्यतिरिक्त आपल्या शरीरावरच्या कातडीसारखं विमानाचं सर्वात बाहेरचं आवरण ॲल्युमिनियमचं बनलेलं असतं. हा धातू विद्युतवाहक आहे. त्यामुळे जर त्याच्याशी विजेचा संपर्क आला तर ती वीज त्या कातडीतच फिरून बाहेर निघून जाण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे तिची संक्रांत आतल्या दिशेनं म्हणजेच आतल्या प्रवाशांच्या दिशेनं वळत नाही. सहसा विजेचा लोळ येतो तो विमानाच्या नाकाकडे किंवा पंखांच्या टोकाकडे. तिथून मग तो विमानाच्या कातडीतून विहरत विहरत शेपटातून बाहेर निघून जातो, त्यामुळे विमानाला धक्का पोहोचत नाही. आधुनिक विमानांवर तर स्टॅटिक विक नावाची एक धातूची वात बसवलेली असते. ही विद्युतयंत्रणेद्वारे विमानाच्या कातडीला जोडलेली असते. या वातीवर काही धातूचेच काटे असतात. ते विजेच्या लोळाला आपल्याकडे आकर्षित करण्याचं काम करतात. तिथं तसा पोहोचलेला लोळ त्या काट्यांमधून वातीत आणि वातीमधून विमानाच्या कातडीत शिरुन बाहेर निघून जातो. शिवाय आतल्या सगळ्या इलेक्ट्रॉनिक यंत्रणेवर त्या विजेपासून बचाव करणारं कवच असल्यामुळं त्यातही काही बिघाड होत नाही. विमान सुरळीत पुढे-पुढे जात राहतं.



## महाकाय हत्ती - मॅमथ

ज्ञान - विज्ञान



इंग्रजीत महाप्रचंड या अर्थी 'मॅमथ' हा शब्द वापरतात. परंतु प्राचीन काळी, सुमारे एक कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पाठीवर मॅमथ नावाचे विशालकाय प्राणी खरोखरच वावरत होते. हा प्राणी हत्तीच्या कुळातला होता आणि अगदी अलीकडे म्हणजे अश्मयुगीन मानवाच्या काळातही त्याचे अस्तित्व जगाच्या अनेक भागांत होते.

सध्या पृथ्वीतलावर मुख्यतः दोनच जातीचे हत्ती दिसून येतात. एक म्हणजे आफ्रिकन हत्ती व दुसरे म्हणजे भारतात आढळणारे आशियाई हत्ती. पण एके काळी हत्तीच्या १४-१५ स्वतंत्र जाती अस्तित्वात होत्या. त्यातलीच मॅमथ ही एक होय.

मॅमथचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या सर्वांगावार असणारे दाट काळसर तपकिरी रंगाचे लांब केस! हे केस त्याच्या शरीरापासून ते खाली जमिनीवर लोळत. या हत्तींना 'मॅमथ' म्हणजे महाप्रचंड असे नाव दिले असले, तरी आकाराने ते सध्याच्या हत्तीएवढेच होते. त्यांचे पुढचे सुळे मात्र अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण गोल वळलेले असे होते. या सुळ्यांची टोके आत एकमेकांकडे वळलेली असत. सध्याचे हत्ती फक्त उष्ण आणि समशीतोष्ण कटिबंधातच आढळतात पण हे मॅमथ त्यांच्या अंगावरील दाट केसांच्या आवरणामुळे दाट बर्फाच्या थंड प्रदेशातही सुखेनैव राहत असत. आर्क्टिक हवामानाच्या प्रदेशातही त्यांचे अवशेष आढळले आहेत.

१९०० साली सैबेरियात एका रशियन शिकाऱ्याला बर्फाच्या ढिगात पुरल्या गेलेल्या एका मॅमथचे धूड सापडले. या मॅमथचे शरीर, त्यावरची कातडी, केसासह बर्फात सुरक्षित राहिले होते. इतकेच नव्हे तर त्याच्या पोटातील अन्नाचा काही भागसुद्धा जसाच्या तसा राहिला होता. वस्तुतः हा मॅमथ या भूप्रदेशात २५ हजार वर्षांपूर्वी वावरत होता. त्याचा अर्थ निसर्गाच्या या शीतपेटीत मॅमथचा मृतदेह २५ हजार वर्षे जसाच्या तसा टिकून राहिला होता.

## अनमोल भेटवस्तू

संस्कार सुमने

आयसेनहॉवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्या कार्यालयात एक शोकेस होती. त्यात एक सुंदर झाडू ठेवला होता. राष्ट्राध्यक्षांना जे भेटायला येत त्यांना तो झाडू पाहून खूप आश्चर्य वाटत असे. अनेक तऱ्हेचे विचार त्यांच्या मनात येत, परंतु झाडूसंबंधी विचारण्याचे कोणाला धैर्य होत नव्हते.



राष्ट्राध्यक्षांच्या लक्षात आले की, जो आपल्या ऑफिसमध्ये येतो तो झाडूकडे टक लावून पाहत असतो. लोकांची जिज्ञासा शांत करण्याच्या दृष्टीने त्यांनी स्वतःच एके दिवशी तो झाडू तेथे असण्याचे प्रयोजन कागदावर लिहिले व तो कागद झाडूशेजारी चिकटवून ठेवला. त्या कागदावर मजकूर खालीलप्रमाणे होता -

''मी हा झाडू येथे एका विशिष्ट हेतूने ठेवला आहे. जेव्हा मी राष्ट्राध्यक्ष झालो तेव्हा मला अनेक बहुमोल भेटवस्तू मिळाल्या. त्यात या झाडूचा पण समावेश होता. मी सर्व भेटवस्तूत ही श्रेष्ठ भेट मानली. ज्याने मला तो दिला त्याने त्याच्यासोबत एक पत्र पण मला दिले. या पत्रात त्याने लिहिले होते, 'आपण निवडणुकीच्या प्रचाराच्या भाषणांमध्ये प्रशासनातील व राष्ट्रीय जीवनातील घाण दूर करून स्वच्छ कारभार करण्याचे अभिवचन दिले होते. म्हणून मी हा झाडू आपणास मुद्दाम देत आहे. त्यामुळे क्षणाक्षणाला आपल्याला आपण केलेल्या भाषणाची व दिलेल्या आश्वासनांची आठवण होईल. भेट देणाऱ्यांच्या या शब्दांनी मला चांगलेच विचारप्रवण केले. माझ्या कर्तव्याचे मला सदैव स्मरण राहावे म्हणून मी ही अनमोल भेटवस्तू काम करताना सदैव डोळ्यासमोर ठेवली आहे.''



## कथा सरित्सागर

कथाविश्व



प्राचीन संस्कृती वाङ्मयात अत्यंत नवलपूर्ण, अद्भूत तसेच उद्बोधक कथांचा प्रचंड खजिना आहे. लोककथा, दंतकथा, चुटके नीतिकथा, उपदेशपर तात्पर्य असणाऱ्या कथा असे नानाप्रकारचे कथावाङ्मय संस्कृतात आहे. यापैकी सर्वात मोठा कथासंग्रह म्हणजे बृहत्कथा सरित्सागर असे म्हणता येईल. इ. सनाच्या ३ ऱ्या किंवा ४ थ्या शतकात सातवाहन राजांच्या दरबारात असलेल्या गुणाढ्य नावाच्या ग्रंथकाराने बृहत्कथा नावाचा प्रचंड कथासंग्रह पैशाची भाषेत लिहिला. काळाच्या ओघात हा मूळ ग्रंथ नष्ट झाला; पण या ग्रंथावरून काश्मिरातील क्षेमेंद्राने 'बृहत्कथा मंजिरी' आणि सोमदेवाने कथासरित्सागर नावाचे संस्कृत तर्जुमे तयार केले. सोमदेव हा काश्मिरी ब्राह्मण असून त्याने जालंधरची राजकन्या सूर्यमती हिचे मन रिझविण्यासाठी ही कथासरित्सागराची रचना केली. या रचनेचा काळ १०६२ ते १०८३ च्या सुमाराचा असावा.

सोमदेवाचा कथासरित्सागर खरोखरच नावाप्रमाणे कथारुपी सरितांचा मिळून बनलेला सागर आहे. त्यामध्ये एकूण बावीस हजार श्लोक आहेत. मूळच्या बृहत्कथेत वत्सराज उदयनाचा पुत्र नरवाहनदत्त या प्रेमवीराच्या साहसाची कथा आहे. नरवाहनदत्ताला मदनमंचुका या रुपमती पत्नीची तसेच विद्याधरांच्या साम्राज्याची प्राप्ती होऊन ही कथा संपते. या कामात त्याला कराव्या लागणाऱ्या साहसप्रसंगामुळे कथेचा विस्तार झालेला आहे. सोमदेवाने या मूळच्या कथेत आणखी कित्येक कथा आणि उपकथांची भर घातली आहे. सर्व कथांची १८ लंबकात मांडणी केली आहे. पहिल्या तीन लंबकांत कथापीठ आणि उदयनाची कथा, चवथ्या मध्ये नरवाहनदत्ताचा जन्म, सहाव्या लंबकात मदनमंचुका नायिकेचे आगमन, त्यानंतर तिचे अपहरण, नंतर तिचा शोध घेत नरवाहनदत्ताची देशोदेशी भटकंती; या भटकंतीत अनेक साहसे, अनेक सुंदरींशी परिचय व विवाह, आणि शेवटी मदनमंचुकेची पुनर्प्राप्ती, या कथा भागाबरोबरच सोमदेवाने वेताळपंचविशी तसेच सिंहसनबत्तिशीच्या विक्रमाच्या कथाही या सरित्सागरात घातल्या आहेत.


## उंदीर आणि बेडूक..




उंदीर आणि बेडूक मित्र होते फार,
नदिकाळी खेळायला दोघेही नेहमी तयार...
मस्करी करता करता मारायचे खुप उड्या,
करायचे नेहमीच दोघ खोड्या..
बेडकाने एकदा उंदराचा पाय
पायाला बांधला, उडी मारून पाण्यात पोहत
पोहत गेला..
उंदराच्या नाकातोंडात बरच पाणी गेलं,
श्वास कोंडून बिचारं उंदीर जिवानं मेलं..
वरून घारीनं उंदराला तरंगताना पाहिलं,
चोचित पकडून वर वर नेलं...
पाय बांधल्यामुळं बेडुकही सोबत गेलं,
मस्करी करता करता आयतिच शिकार
झालं..
दोघांची झाली शिकार घार झाली शिकारी,
दोघांनाही अंगलट आली एकमेकांची
मस्करी...

**राजकुमार नायक**, सवना


## Shadow - matching



## Find The Difference



## How to draw



## Find The Path



## चित्र रंगवा



# अभि नहीं तो कभी नहीं' हे लक्षात ठेवून आझाद मैदानावरील आंदोलनात बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्प्यासाठी लागणारा निधी मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती महाराष्ट्र राज्य व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. तसेच बुधवार दि.०२ जुलै रोजी शिक्षक आमदार आणि पदवीधर आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार निधी उपलब्ध करून द्या या मागणीचे निवेदन दिले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षक व पदवीधर आमदारा सोबत तात्काळ निधी संदर्भात बैठक घेऊन मार्ग काढु सांगितले आहे. त्यामुळे सर्व आमदार त्यांच्या परीने प्रयत्न करीत आहेत. दुसरीकडे आंदोलनस्थळी शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची गरज आहे. तसेच शिक्षक समन्वयक संघाने ८





व ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. या बंदमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व शाळेचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळा बंद करून मोठ्या संख्येने आंदोलनाला उपस्थित रहावे असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्डद (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला आहे. परंतु सलग नवीन सरकारचे तीन अधिवेशन झाली. या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झालेली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला. विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्डद (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर, उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर , उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर, जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरुड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर,माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर ,परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

## श्री व्यंकटेश पब्लिक स्कुलमध्ये आषाढी निमित्त विठ्ठल दिंडीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य नगरी भागात असलेल्या श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशी सणानिमित्त विठ्ठल दिंडी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी



शाळेतील छोट्या बालकांना विठ्ठल रुक्माई ची वेशभूषा केल्याने दिंडीमध्ये सहभागी विद्यार्थी आणि शिक्षक पालकात मोठा उत्साह संचारला होता.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीड शहरातील आदित्य नगरी भागात असलेल्या श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी सणा निमित्त विठ्ठल दिंडी आयोजित करण्यात आली होती. दिंडीच्या सुरुवातीला प्राचार्य श्री आर.एम. हावळे सर आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक एस. एस. धुमाळ सर यांच्या हस्ते विठ्ठलाची महापूजा करण्यात आली. त्यानंतर पायी दिंडी सोहळा आदित्य नगरी परिसरातुन मोठ्या उत्साहात करण्यात आली. या दिंडीत शाळेतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनींनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान केली होती. या वेळी विठु माऊलीचा जयघोष करत सर्व विद्यार्थी दिंडीत उत्साहाने चालत होते. दिंडीतील सहभागी शाळेतील विद्यार्थ्यांनी माऊली माऊली...विठ्ठल विठ्ठल...या गितावर नृत्य केले. या पायी दिंडीचा समारोप विठ्ठल रखुमाईच्या मंदिरामध्ये करण्यात आला. या दिंडीमध्ये पालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला!

### १७ जागांसाठी रणधुमाळी,१० ऑगस्टला मतदान तर १२ ऑगस्टला मतमोजणी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., परळी वैजनाथच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. जिल्हा उपनिबंधक व निवडणूक निर्णय अधिकारी समृत जाधव यांनी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया होणार आहे. सध्या या बँकेवर ना.पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ आहे.

७ ते ११ जुलै दरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जाणार आहेत. १४ जुलै रोजी अर्जांची छाननी होणार आहे. इच्छुक उमेदवारांसाठी अर्ज मागे घेण्याची मुदत १५ जुलै ते २९ जुलैपर्यंत ठेवण्यात आली आहे. अंतिम यादी व चिन्हांचे वाटप ३० जुलै रोजी होईल. मतदान १० ऑगस्टला - सकाळी ८ ते संध्या ४ वा.पर्यंत



होणार आहे.१२ ऑगस्टला सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीस सुरुवात होवुन निकाल लागेल. ९१७ जागा व संचालक जागांचे आरक्षण पुढीलप्रमाणे: सर्वसाधारण - १२ जागा अनुसूचित जाती - १ जागा इतर मागासवर्गीय - १ जागा भटक्या विमुक्त व विशेष मागास प्रवर्ग - १ जागा महिला प्रतिनिधी - २ जागा निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे: नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुदत: ७ जुलै ते ११ जुलै, सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत छाननी प्रक्रिया: १४ जुलै अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत: १५ जुलै ते २९ जुलै चिन्हांचे वाटप व उमेदवारांची अंतिम यादी: ३० जुलै मतदानाचा दिवस: १० ऑगस्ट, सकाळी ८ ते संध्याकाळी ४ मतमोजणी: १२ ऑगस्ट, सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे.

## बोगस पीक विमा घोटाळ्याचे परळी कनेक्शन

नांदेड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बोगस पीक विमा घोटाळा राज्यभर गाजल्यानंतर सोमवारी रात्री नांदेडातही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जिल्ह्यात २०२४ पासून तब्बल ४ हजार ४५३ शेतकऱ्यांच्या नावावर ४० सेतू सुविधा केंद्र चालकांनी बोगस पिक विमा भरला होता. विशेष म्हणजे त्यात नऊ सुविधा केंद्र चालक हे बीड जिल्ह्यातील परळीचे आहेत. तर काही महाभागांनी चक्क उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांच्या नावाने जिल्ह्यात पीक विमा भरला. आता या ४० सेतू सुविधा केंद्र चालकांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. परंतु जिल्ह्यात अशी अनेक प्रकरणे असण्याची दाट शक्यता आहे. पंतप्रधान पीक विमा योजना ही शासन आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीमार्फत चालविली जाते. २०२४ पासून काही सामाईक सुविधा केंद्र चालकांनी शासनाच्या मालकीच्या, संस्थांच्या नावावर असलेल्या, करार, संमतीपत्र नसलेल्या जमिनीवर शेतकऱ्यांच्या नावे पीक विमा भरला होता. छाननीत ही संख्या ४ हजार ४५३ एवढी निघाली. त्यात ४० सेतू सुविधा केंद्र चालकांची नावे पुढे आली. त्यामध्ये परळी, परभणी, पुणे, लातूर, जालना, नांदेड तसेच उत्तर प्रदेशातील सेतू सुविधा केंद्र चालकांचा समावेश होता. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातच सर्वात अगोदर बोगस पीक विम्याला वाचा फुटली होती. त्याच बीड जिल्ह्यातील नऊ सुविधा केंद्र चालकांचाही नांदेडातील घोटाळ्यात सहभाग आहे.

### ४० पैकी ९ सुविधा केंद्र चालक परळीचे

जिल्हा सनियंत्रण समितीच्या बैठकीत ४० सेतू सुविधा केंद्र चालकांच्या विरोधात कारवाईच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिल्या होत्या.

त्यात दहापेक्षा जास्त बोगस अर्ज दाखल केलेल्या सेतू सुविधा केंद्र चालकांकडून खुलासे मागविण्यात आले होते. त्यानंतर जिल्हास्तरीय आढावा बैठकीत हे खुलासे एकमताने नामंजूर करण्यात आल्यानंतर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री आत्माराम पांडुरंग वाव्हळ यांनी सचिन ऑफसेट, सुभाष रोड, बीड येथे छापून साप्ताहिक संघर्ष यात्रा कार्यालय, गोविंद नगर धानोरा रोड बीड ता. जि. बीड (महाराष्ट्र)- ४३ ११ २२ येथे प्रकाशित केले मो. ८२ ७५ २६ ८५ ८९ या अंकातील विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (बीड न्यायालय कक्षेत)